

संत शिरोमणी
रविदास महाराज

मन चंगा तो कठोती में गंगा !

संपादकीय सल्लागार : मा. पंढरीनाथ पवार

ई-मासिक

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मुखपत्र

# अधिकृत RCM




मा.श्री.बबनराव (नाना) घोलप
माजी समाजकल्याण मंत्री, महाराष्ट्र

adhikrutrcm@gmail.com | वर्ष : १, अंक : ७, मार्च २०२१, पाने : ४ | संपादक : डॉ. शांताराम पां. कारंडे


**जा देखे घनि उपजै, नरक कुंड में बास**
**प्रेम भगति सौं ऊधरे, प्रगटत जन रैदास**

ज्या रविदासांना पाहून लोकांना घृणा यायची, ज्या रविदासांचे वास्तव्य स्थान हे नरक कुंडासमान वाटायचे, त्याच रविदासांना इश्वरभक्तीत लीन झालेलं पाहून रविदासांचा मानवजातीत पुन्हा नव्याने जन्म झाला, असेच मानावे लागेल.

# संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची ६४४ वी जयंती उत्साहात संपन्न!



राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने चारकोप मध्ये संत रविदास जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प. उपनगर शहराध्यक्ष दादाभाऊ माने व उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष दीपक माने यांच्या पुढाकाराने आयोजित रोहिदास जयंती उत्सवाला राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. शांताराम कारंडे, स्थानिक नगरसेविका व शिक्षण समिती अध्यक्षा सौ. संध्या दोषी, नगरसेवक श्री. बाळा तावडे इ. मान्यवर उपस्थित होते.



**पहुर ग्रामीण रुग्णालय येथे संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची ६४४ वी जयंती साजरी करण्यात आली.** याप्रसंगी डॉ.संदिप कुमावत, डॉ.जितेंद्र वानखेडे, डॉ.प्रफुल्ल पाटिल, जाधव नाना, कुंभार सिस्टर, चौधरी भाऊ, दामोदर दादा, जैन भाऊ, भगवान भाऊ, मोरे भाऊ, वाणी भाऊ इ.उपस्थित होते.




## राज्यभरात गुरु रविदासजी यांना राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने अभिवादन!

**लातूर (प्रतिनिधी) :**

मानवतेचे पुजारी महामानव राष्ट्रसंत गुरु रविदासजी यांची ६४४ वी जयंती सोशल डिस्टंस पाळून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गुरु रविदासजी यांच्या प्रतिमेला राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अंबादास गवळी व जि.प.चे समाजकल्याण सभापती रोहिदास वाघमारे यांनी पुष्प अर्पण केले.चर्मकार समाजाचे सुपुत्र शिक्षक नरसिंग वाघमोडे यांना ‘‘डॉक्टरेट‘‘पदवी मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी महासंघाचे मराठवाडा उपाध्यक्ष सी.के.मुरळीकर,जेष्ठ नागरिक संग्राम उदबाळे दादा,जिल्हाध्यक्ष बिभीषण सांगवीकर,शिक्षक



जिल्हाध्यक्ष डी.एस.उदबाळे,माजी जिल्हाध्यक्ष अनिल कबाडे,महाराष्ट्र पोलीस राजेंद्र कांबळे,सामाजिक कार्यकर्ते बालाजी साबळे, खंडू बनसोडे,बालाजी साबदे,शेवाळकर,योगेश सुर्यवंशी,बालाजी गुजर,प्रणव गवळी,गौरव सांगवीकर आदीजण उपस्थित होते.






संत रविदास महाराज जयंती निमित्ताने तहसीलदार निता लबडे यांचे प्रतिपादन

## कोरोना त्रिसूत्री अवलंबिणे आता काळाची गरज

**अमरावती (प्रतिनिधी):**

सध्या कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता मास्क लावणे,सोशल डिस्टंसिंगचे पालन करणे,वारंवार हात धुणे या त्रिसुत्रीचे पालन करणे सध्या काळाची गरज झाली आहे असे प्रतिपादन भातकुली तहसीलदार निता लबडे यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय चर्मकार महासंघ जिल्हा कार्यकारणीच्या वतीने टाकरखेडा संभु येथे संत रविदास महाराज यांची ६४४ वी जयंती साजरी करण्यात आली.यावेळी अध्यक्ष भाषणात त्या बोलत होत्या

ग्रामपंचायत सभागृहात संत रविदास महाराज जयंती कोरोना नियमांचे पालन करून मोजक्या आणी साध्या पद्धतीने आयोजित करण्यात आली होती.या कार्यक्रमाला तहसीलदार कु. निता लबडे यांच्यासह वलगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार देवेंद्रसिंग ठाकूर,गट विकास अधिकारी सुरेश थोरात,सरपंचा रश्मी देशमुख,राष्ट्रिय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे आदींची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना भातकुली तहसीलच्या तहसीलदार कु.निता लबडे म्हणाल्या संत रविदास महाराजांच्या जीवनातील प्रत्येक गोष्ट शिकण्यासारखे आहे.त्यांनी मानवकल्याण आणी समाजसुधारणेस असे स्वरुप दिले की,ज्यामुळे सामाजिक एकतेला वेगळी अशी प्रेरणाशक्ती मिळाली.ज्यामुळे केवळ जुन्या संस्कृतीचेच रक्षण झाले नाही तर मानवतेचे रक्षण करणे देखिल सोपे झाले.शेवटी मानव मानव सर्व समान च्या भावनेने एक वेगळे कल्याणकारी क्रांतीचे रुप धारण केले.अशा महान संत रोहिदास महाराज यांचे विचार नवीन पिढीने अंगीकारले पाहिजे,असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

## कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता जिल्ह्यात घरोघरी साजरा होणार संत शिरोमणी गुरु रविदास महाराज जयंती उत्सव

**(संतोष शेंडे)**

टाकरखेडा संभु दि. १७ : संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने दरवर्षी ठीक ठिकाणी मोठा उत्सव साजरा होत असताना यावर्षी कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव पाहता हा जयंती उत्सव सार्वजनिक न करता घरोघरीच साजरा करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी सांगितले,

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप यांनी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने गेल्या कित्येक वर्षांपासून शासनाने रविदास जयंती निमित्त सुट्टी जाहीर करावी ही मागणी शासनाकडे सातत्याने रेटून धरली होती.शासनाने त्याचाच एक भाग म्हणून २७ फेब्रुवारी रोजी संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची जयंती शासकीय कार्यालयांमध्ये साजरी होत आहे.त्यामुळे प्रशासनाने त्यांच्या विभागातील जिल्ह्यातील सर्व शासकीय निमशासकीय




कार्यालयात, ग्रामीण स्तरावर, ग्रामपंचायत,पोलीस ठाणे, अंगणवाडी, प्राथमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र आदी ठिकाणी सदर कार्यक्रम आयोजित केल्या जाणार आहे.परंतु यावर्षी जिल्ह्यात ठिकठिकाणी मोठ मोठे उत्सव देखील आयोजित करण्याबाबत निर्णय राष्ट्रीय चर्मकार संघाच्या वतीने घेण्यात आला होता,परंतु अमरावती जिल्ह्यामध्ये गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून कोरोना रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे.त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी संचार बंदीचे आदेश देखील केलेले आहेत अशा परिस्थितीत समाजबांधवांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या वर्षी आपल्या घरी थाबूंनच रविदास महाराज यांची जयंती साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे,त्यामुळे बबनरावजी घोलप यांच्या आदेशाने आपल्याच घरी हा जयंती उत्सव घरगुती पद्धती साजरा केल्या जाणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष निलेश जामटे यांनी दिली.

रविदास महाराज जयंतीच्या दिवशी आरोग्यविषयक उपक्रम,शिबिरे,रक्तदान शिबिर,जिल्हा स्तरिय स्पर्धा परिक्षा आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात येऊन त्याआधारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू इत्यादी आजार व त्याचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात येऊन आरोग्यविषयक उपक्रमाचे आयोजन करून सोशल डिस्टन्सिंग तसेच स्वच्छतेचे नियम पाळून विशेष लक्ष देण्यात येणार आहे.असे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी कळविले आहे.

## संपादकिय

### खच्चीकरण !!

**एखादा व्यक्ती त्याच्या बुद्धिमतेच्या जोरावर, ताकतीच्या जोरावर किंवा त्याच्या हिंमतीच्या जोरावर एकामागुन एक यशाची शिखरे पार करू लागला असेल तर फक्त त्या ईर्षेपोटी, द्वेषापोटी, किंवा स्वतःचा जळफळाट होतोय तो शमविण्यासाठी त्या व्यक्तीचे कारण नसताना उगीचच केले जाते ते खचीकरण !**

एखाद्याचे खचीकरण करणे म्हणजे अर्थातच त्याला कोणत्याना कोणत्या तरी कारणाने मागे खेचणे, त्याच्या मार्गात मुध्दामहून अडथळा आणणे किंवा त्याच्या कामात व्यत्यय कसा येईल या विचाराने त्याचे मानसिक संतुलन बिगडवणे होय. परंतू एखादा मुरलेला राजकरणी स्वतःचे खच्चीकरण होताना पाहत अगदी सयंम बाळगून शांत राहतो व त्याचा दिवस उजाडताच तो असा काही चौकार किंवा षटकार मारतो की होणारे खच्चीकरण अचानक सन्मानात रूपांतरीत होते. परंतू त्याची सुद्धा वेळ येण्याची तो देखील वाट पाहत असतो.

मुळात कुणाचेही खच्चीकरण कुणीही का करावे ? कधी कधी वाटतं की काही लोकांची वृत्ती नकारात्मक असल्याने त्यांना सकारात्मक गोष्टी पाहण्याची सवय नसते, त्यामुळे कुणी सकारात्मक कार्य करत असेल तर उगीचच त्याच्या कार्यात अडथळा आणला जातो. ज्या गोष्टींना व्यवहारात काहीच किंमत नसते अशा गोष्टीचा बाऊ केला जातो. त्या गोष्टीवर नाहक विरोधाभास निर्माण करून वेगवेगळ्या स्टाईलने रंगवल्या जातात ज्या व्यक्तींचे खच्चीकरण केले जाते त्या व्यक्तीशी इतर अन्य जण तात्विक चर्चा करण्यास असमर्थ असल्याने मग तांत्रिक गोष्टींचा भडीमार केला जातो. ज्याचे खच्चीकरण करण्याचा प्रयत इतर काह जे करीत असतात मग ते स्वतः वेगवेगळ्या मतांचे असून सुद्धा फक्त एकाच्या खच्चीकरणासाठी एकमतावर येतात. पुढे त्यांचे काय होणार हे सांगण्यासाठी कोणत्या ज्योतिषाची गरज नसते.

खचीकरण करण्यात तसा कुणाचा वाईट हेतू असेल, असेही नसते. कारण ज्याचे खचीकरण केले जात असते त्याच्या तोंडावर व समक्ष त्याच्या विरोधात बोलण्याची कुणाची हिंमत नसते, परंतू कुरघोडी करून, त्याला आपल्यापेक्षा कमीपणा कसा आणता येईल याच विचारात खच्चीकरण करणारे वावरत असतात. त्यांच्या स्वतःच्या नजरेत ते अगदी योग्य असतात कारण उजव्या डोळ्यावर मारलेली पट्टी त्यांना आरशामध्ये डाव्या डोळ्यावर मारलेली दिसते. आपण बेंबीच्या देठापासून ओरडून सांगितले तरी त्यांचा त्या आरश्यावरच भरोसा असतो. एखादी गोष्ट नक्की चूक आहे की बरोबर हे तपासून घेण्यापेक्षा, सत्याला खरी साथ देण्यापेक्षा लोक काय म्हणतात किंवा म्हणतील या विवंचनेत ते आपल्याच जवळच्या माणसाला हृदयातून दुखावतात. खच्चीकरण करणे ही तशी एक प्रकारची विकृतीच आहे. प्रकृती मध्ये कुणीही कुणाचे खच्चीकरण करत नसतो तर उलट मोठेपणा देत असतो. एखादा दहा रुपयांचे काम करत असेल तर मोठेपणा देताना त्या कामाचे शंभर रुपये सांगेतले जातात.तर उलट खच्चीकरण करणारे त्याच कामाला एक रुपयाची सुद्धा नव्हे तर एक पैशाची देखील किंमत दयायला तयार नसतात. एखाद्याला मोठेपणा देणं किंवा त्याचं खच्चीकरण करणं हे सर्वश्री कुणाच्याही प्रकृतीवरच अवलंबून असतं. ज्यांची प्रकृती ठीक नसते तेच लोक विकृत होऊन खच्चीकरण करत राहतात. समाजामध्ये वावरताना प्रत्येकाला यशाच्या शर्यतीती भाग घेऊन जिंकायचं असतं.त्यामुळे जो - तो आपापल्या क्षमतेने क्षमतेने कुवतीनुसार धावत असतो. ज्यांच्या मध्ये शर्यत जिंकण्यासाठी लागणारी क्षमता नसते तेच लोक मग स्वतः जलद गतीने धावून जिंकण्यापेक्षा उगीचच आपल्या बरोबर धावणाऱ्या सहकाऱ्याच्या पायात पाय अडकवून पडण्याचा प्रकार म्हणजेच एकप्रकारचे खच्चीकरण करणे होय.



**पंढरीनाथ पवार**
राष्ट्रीय सल्लागार
राष्ट्रीय चर्मकार महासंघ
■ 98202 58049

# ऐक्य परिषदेचं राजकारण करु नका!



## आर या पार

डॉ. शांताराम कारंडे

**प्रिय समाज बांधव यांस,**
**सस्नेह जय रविदास !**

**गेली अनेक वर्षे समाजात कार्य करत असताना विविध चर्मकार संघटनांच्या नेत्यांना भेटण्याचा योग आला. समाजाची सेवा करण्याची इच्छा असल्याने काही मंडळींच्या संपर्कात आलो. जवळ जवळ सर्वच नेत्यांशी माझा संपर्क आला. अगदी मोठ्या नेत्यापासून ते लहानातल्या लहान नेत्यापर्यंत झाडून सगळ्याच नेत्यांशी डायरेक्ट संबंध आला. आणि आठ वर्षांच्या अभ्यासानंतर मला ठामपणे एकमेव नेत्याचे नेतृत्व आवडले ते म्हणजे माजी समाजकल्याण मंत्री असलेले क्रांतिकारी नेते, चर्मकार हृदयसम्राट आ. बबनराव घोलप अर्थात समस्त चर्मकारांचे लाडके नानासाहेब!**

त्या काळात जो व्यक्ती स्वतः मंत्री असताना स्वतःचा विचार न करता आपल्या समाजाचा विचार करतो, एका राजकीय पक्षाचा नेता असताना तो समाजाची मोट बांधतो..... राजकीय गणिताचा विचार न करता फक्त आपल्या समाजबांधवासाठी अहोरात्र अख्खा महाराष्ट्र पालथा घालतो अशा भक्कम व धाडसी नेत्याचे नेतृत्व स्वीकारून मी राष्ट्रीय चर्मकार महासंघात सक्रिय झालो. मग त्या माध्यमातून अनेक नेत्यांशी जवळीक झाली आणि कुणाला किती समाजाविषयी तळमळ आहे, कोण समाजहितासाठी झटतोय आणि कोण स्वतःच्या स्वार्थासाठी समाजाचा वापर करून समाजसेवेचे ढोंग करत आहे याचा अंदाज आला. परंतु आपल्याच समाजाच्या नेत्याविरुद्ध आपण का बोलावे म्हणून मी शांतपणे आपले काम करत रहिलो.

तो दिवस मला अजूनही आठवतोय की, एके दिवशी नानांनी स्वतः मला फोन करून सांगितले की बुलढाण्याची वाईट घटना घडल्यामुळे सर्व समाज बांधव पुन्हा एकवटतोय तर तू आणि उमाकांत डोईफोडे असे दोघांनी मिळून त्या ऐक्य परिषदेच्या बैठकीला जावा आणि आपल्या संघटनेचे प्रतिनिधित्व करा.

आदरणीय नानांच्या आदेशानुसार आम्ही ऐक्य परिषदेच्या धारावी, औरंगाबाद व मुंबई अशा विविध बैठकांना उपस्थित राहिलो. प्रत्येक चर्चा पाहिल्यानंतर मला एक प्रश्न पडला की आपली संघटना संपूर्ण महाराष्ट्रातील तालुका - गावापर्यंत पोहचलेली असताना या नवीन समिकरणाची समाजाला नक्की गरज आहे का ? ही मोट नक्की कुणासाठी आणि का बांधली जातेय ? बरं ज्यांना ऐक्य परिषदेच्या अध्यक्षपदाची स्वप्ने पडू लागली त्यांनी नको ते गलिच्छ राजकारण सुरू केले. बैठकीच्या आदल्या दिवशीच उद्याचे निर्णय ठरू लागले. कुणी काय बोलायचं ते आधीच ठरवू लागले. स्वतःची संघटना वाढवू शकत नसल्यामुळे मग दुसऱ्या संघटनेची लोकं गोळा करून फक्त आपल्या हिताचे निर्णय घ्यावयाला लावले. शेवटी सायन येथील एका बैठकीत तर जाणीवपूर्वक नानांचे खच्चीकरण करण्याचा डाव आखला. ते सर्व नाना ओळखून गेले आणि बैठकीसाठी वेळ काढलेला असताना त्यांच्या कपटी कारस्थानापुढे नाना शांतपणे विचार करून म्हणाले की, समाजाचं भलं जर तुमच्या माध्यमातून होणार असेल तर खुशाल तुम्ही प्रतिनिधित्व करा मात्र खोटे आरोप करून माझीच नव्हे तर कोणत्याही चर्मकार नेत्यांची मानहानी करू नका असे सांगून बैठकीतून निघून गेले.

उगीच आपल्याच समाजबांधवांना त्रास होईल असे बोलण्यापेक्षा नाना बैठक सोडून निघून गेले. त्यावेळी मात्र उमाकांत डोईफोडेंची व माझी चांगलीच पंचाईत झाली. तरीही नानांच्याच व्यापक दृष्टिकोनामुळे समाजहित पाहत नानांच्या आदेशाने आम्ही ती बैठक पूर्ण केली. नाना उलट काहीतरी बोलावे असा प्रसंग काही नेत्यांनी निर्माण केला जेणेकरून नानांचा तोच शब्द पकडून राजकारण व नानांची बदनामी करता यावी. परंतु समाजाबद्दल आस्था व प्रेम असलेल्या नानांनी कुणालाही न दुखवता सर्व सहन करत शांतपणे ऐकून घेतले. त्यावेळी पुन्हा एकदा नाना एक नेता व सक्षम नेतृत्व म्हणून मला भावले. ज्या ऐक्यात मोजून वीस संघटनाही नव्हत्या त्या ऐक्यात दोनशे संघटना असल्याची बतावणी केली आणि माझा गरीब चर्मकार त्याला खरं समजून बसला. स्वतःच्या संघटनेत मोजून वीस लोक नसताना शिखर संघटना म्हणून फुगा फुगवला. परंतु तो फुगा अल्पावधीतच फुटला. कारण बघता बघता दुसरी ऐक्य परिषद उदयाला आली. नवे अध्यक्ष झालेल्या मेहकरच्या लक्ष्मणराव घुमरेंनी काही करायच्या आधीच उल्हास वरपे या समाज बांधवाने तिसरी चर्मकार ऐक्य परिषद सरळ नोंदणीकृत करून प्रस्थापित नेत्यांची चांगलीच पंचाईत केली. नाही म्हटलं तरी वरपेंनी तिसरी ऐक्य परिषदेची मुहूर्तमेढ मोठ्या हिमतीने रोवली.

आता म्हणे एका युवकाला ऐक्य परिषदेचे अध्यक्ष करून युवकांना आम्ही संधी दिली हे दाखविण्यासाठी पुन्हा राजकारण झाल्याचे दिसुन येते. मात्र, ही ऐक्य परिषद तीच आहे की चौथी ? हेच चर्मकार बांधवांना समजेनासे झाले. त्याबद्दल समाजात अजूनही संभ्रम निर्माण झाला आहे. अध्यक्ष कुणी व्हावे हा ज्याचा त्याचा प्रश्न असला तरीही एक महत्वाचा प्रश्न पडतो की, ज्यांची निवड केली ती व्यापक दृष्टिकोनातून की फक्त द्वेषातून ? असा प्रश्न सर्वसामान्य बांधवांना पडलेला आहे. दुसऱ्याचा एक डोळा घालविण्यासाठी स्वतःचे दोन्ही डोळे फोडून घेतलेल्या एका कथेतील व्यक्तीची तर गत झाली नाही ना ? सध्या समाजातील अनेक जण नव्या संघटना काढण्याच्या शर्यतीत धावत असताना आता या शिखर संघटनेच्या नावाने कुणी स्वार्थी ढोंगी स्वयंघोषित नेते राजकारण तर करत नाही ना याची खात्री प्रत्येकाने करून घ्यायलाच हवी. कारण तिथेही एक तथ्य आहे आणि ते मोठ्या मनाने स्वीकारावेच लागेल. ते सत्य म्हणजे आता जे काही शिखर संघटनेत नेते आहेत ते सगळेच पूर्वी कधीतरी आ. बबनराव घोलपांच्या छत्रछायेखाली तालमीत घडलेले आहेत. त्या सर्वांचे आदरणीय व्यक्तिमत्व हे फक्त नानांच आहेत हे अनेकांनी मला खाजगीत मान्य केले आहे. त्यामुळे हे सत्य कुणीही नाकारू शकत नाही. ज्यांना नानांनी त्यांच्या सामाजिक हिताच्या व संघटना वाढीच्या दृष्टिकोनातून केलेल्या चुकांमुळे संघटनेतून हद्दपार केले आज तेच गलिच्छ व हीन दर्जाचे राजकारण करताना दिसत आहेत.

म्हणून मी चर्मकार समाजाच्या प्रत्येक घटकाला हाथ जोडून सांगू इच्छितो की, राष्ट्रीय चर्मकार महासंघ ही देशातील सर्वात मोठी चर्मकार संघटना असून त्यामध्ये सामील व्हावे. मी नानांचा अनुयायी म्हणून नव्हे तर एक चर्मकार बांधव व सुशिक्षित तरुण म्हणून विनंती करू इच्छितो की खरे ऐक्य करायचेच असेल तर ते संत शिरोमणी रविदास महाराजांच्या क्रांतिकारी व मानवतावादी विचारांचे करावे. ऐक्य करायचेच असेल तर एकूण सर्वच संघटनांना खऱ्या अर्थाने एकत्र आणून करावे, जे नानांनी सन १९९५ सालीच करून दाखवले. त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व छोट्या मोठ्या संघटनांना एकाच संघटनेत विलीन करून एकमेव अशा महाराष्ट्रीय चर्मकार संघाची स्थापना करीत खऱ्या अर्थाने चर्मकार बांधवांचे व संघटनांचे ऐक्य घडवून आणले. ज्या नानांनी आपल्या चर्मकार समाजासाठी आयुष्यभर स्वतःला झिजवले, फक्त आणि फक्त चर्मकार समाजाला केंद्रबिंदू मानून आयुष्य वेचले त्यांना डावलून कोणतेच ऐक्य होऊ शकत

**उर्वरित पान ४ वर**

संपादक मंडळ

■ **पंढरीनाथ पवार** संपादकीय सल्लागार ■ **डॉ.शांताराम कारंडे** संपादक ■ **जयवंत बामणे** कार्यकारी संपादक
■ **सहसंपादक :** रविंद्र राजुस्कर, दत्तात्रय गोतिसे, रोहीदास बनसोडे, डॉ गणेश बोरकर, मारुती शिवदास
■ **उपसंपादक :** श्रीमती सरोज बिसुरे, पांडुरंग बाविस्कर, ज्ञानेश्वर बसेशंकर,

हे ई-मासिक वृत्तपत्र राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने मुद्रक, संपादक डॉ.शांताराम कारंडे यांनी प्रकाशक मे. सिध्दांत प्रकाशनातर्फे २२१/६, गीतगुंजन, सेक्टर-२, चारकोप, कांदिवली (प), मुंबई- ६७ येथून डिजिटली प्रकाशित केले. संपादकीय सल्लागार : पंढरीनाथ पवार email : adhikrutrcm@gmail.com (अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या आणि लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

## राष्ट्रीय चर्मकार महासंघ नागपूर आणि संत रविदास छात्रालय संस्थेच्या वतीने संत शिरोमणी गुरू रविदास आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव संपन्न

**अमरावती (प्रतिनिधी) :**

आज शुक्रवार दिनांक १९-०२-२०२१ला सकाळी ११-००वा.जगाला मानवता आणि समतेचा संदेश देणारे संत शिरोमणी गुरू रविदास महाराज आणि शुद्रातिशुद्रांच्या हाती शस्त्र देणारे ,रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने रविदास छात्रालय हनुमान नगर नागपूर येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि छात्रालयाचे उपाध्यक्ष श्री ज्ञानेश्वर बसेशंकर यांनी अध्यक्षस्थान भूषविले.प्रमुख अतिथी म्हणून छात्रालयाचे सचिव श्री दामोदर चंगोले , संघटनेचे शहराध्यक्ष महादेव बिंझाडे, मुख्य सल्लागार राजेंद्र मालखेडे उपस्थित होते.आजचा नियोजित उपवर वधु परिचय मेळावा आणि'रेशीमगाठी''परिचय पुस्तिका प्रकाशन सोहळा कोविड-१९ कारणाने मनपा नागपूर प्रशासनाने ५०पेक्षा जास्त लोकांना कार्यक्रमात सहभागी होण्यावर बंदी घातल्याने रद्द करण्यात आला आहे.

जयंतीचा कार्यक्रम ५०पेक्षा कमी लोकांच्या उपस्थितीत करण्यात आला.

संचालन व आभार प्रदर्शन सचिव श्री ज्ञानेश्वर काकडे यांनी केले

कार्यक्रमाला पूर्व विदर्भ अध्यक्ष लिलाधर कानोडे,कार्याध्यक्ष अनिल काटोले, दिगंबर पिंपळकर, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष उषा इंगळे,नीता काटोले, चंद्रकला घोडे,तारा बसेशंकर,प्रभाकर राजुरकर, रामदास घोडे, फुलचंद मालाधरी, धनंजय लिपटे, नानाजी शिंगाडे, राजेंद्र काटोले, राजेश सोपानकर, राजकुमार डाहाके, विठ्ठल चरडे, डॉ सुरेश बसेशंकर,सूनील खोब्रागडे, आशिष ठोंबरे,वामन बोडखे, मधुकर चापके, प्रेम मुंदाफळे, रमेश धावंडे, महादेव घोडे प्रकाश कुहीकर दिलीप शेंडे ,सुनील शेंडे, आशिष वानखेडे, मधुकर इंगळे, अशोक इंगळे,इ. उपस्थित होते.

## संत श्री रविदास जयंती उत्साहात संपन्न...



अमरावती जिल्ह्यातील वाडघूळ गांवी साजरी झालेली संत रविदास जयंती...

## सांगली जिल्हाध्यक्ष प्रभाकर चव्हाण यांना 'सुवर्णलक्ष्य राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार'

**बुलढाणा :**



राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे सांगली जिल्हा अध्यक्ष प्रभाकर डी. चव्हाण यांना नुकतेच मेजर ध्यानचंद क्रीडा परिषद, भारत यांच्यावतीने गौरविण्यात आले. १७ फेब्रुवारीला इचलकरंजी येथे पार पडलेल्या एका सोहळ्यात प्रभाकर चव्हाण यांना त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल तसेच सध्या करीत असलेल्या सामाजिक कार्याबद्दल उपरोक्त संस्थेच्या वतीने गौरविण्यात आले. प्रभाकर चव्हाण हे महासंघाच्या माध्यमातून सांगली जिल्ह्यात समाजासाठी उल्लेखनीय कार्य करीत असून समाजाला तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघाला त्यांच्या या यशाचा अभिमान वाटतो.

## रायगड जिल्ह्याचा अभ्यासदौरा!









## महासंघाच्या वतीने संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांच्या जयंती निमित्त नियोजन बैठकीत मानवत उत्सव समितीचे नियुक्ती जाहिर

**मानवत प्रतिनिधी :**

सालाबाद प्रमाणे या वर्षी ही आपण संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करणार आहोत त्या अनुषंगाने काल रात्री श्री संजय अहिरे साहेब यांचा नवीन घरी समाज मिटींग चे आयोजन राष्ट्रीय चर्मकार महासंघ वतिने करण्यात आले होते.

या वेळी उपस्थित समाज बांधवांनी विचार विनीमय करुन जयंती उत्सव कार्यक्रमची रुपरेखा ठरवली व सर्वान मते या वर्षी ही जयंती उत्सव समिती अध्यक्ष म्हणून श्री अनिल वाघ सरांना जयंती ची जबाबदारी सोपविला तसेच उपाध्यक्ष म्हणून श्री सुभाष चिमणकारे सर सचिव श्री नितीन ठाकरे सर व खजिनदार म्हणून श्री लक्ष्मण महाले यांची सर्वांना मते निवड करण्यात आली.

समाज मिटिंग मधे अधिकारी कर्मचारी संघटनेचे ता अध्यक्ष श्री संजय अहिरे श्री अशोक गव्हाणे सर (उप प्राचार्य किसान महाविद्यालय) श्री अनिल घुले (रिटायर्ड नगरपालिका कर्मचारी) श्री आनंद नेरकर (जिल्हा सदस्य.) युवा ता अध्यक्ष श्री मंगेश मोरे, सुकलाल साळुंखे सर,(ता सचिन)श्री रतिलाल मोरे (जिल्हा सदस्य)श्री कैलास कुंभकर (मेनेजर बुलठाना अर्बन बँक) श्री सुधाम भालेराव (तहसील ऑफीस) श्री रविंद्र सावकारे सर (आयकर विभाग) श्री सुभाष गवळे सर, श्री शामकांत अहिरे सर, श्री सुधाकर बाविस्कर सर, श्री सतीष वाघ सर, श्री रविंद्र ठाकरे सर, श्री किरण विसावे सर श्री अमूर्तराज विसावे (फोरेस्ट कर्मचारी) श्री कैलास महाले ( युवा उपाध्यक्ष) समाज बांधव उपस्थित होते...



# समतेचे पुरस्कर्ते संत रविदास

**भारत हा प्रामुख्याने धर्मनिरपेक्ष गणराज्य म्हणुन जगाच्या स्मृतीपटलावर वावरत असला तरी त्यांचे वास्तविक सत्य हे भारतीय घटक राज्यामध्ये दडलेल्या विविध जातीयतेमध्ये दिसुन येते.आज आपल्या देशामध्ये प्रचंड जातीयता दिसुन येते.जगातील जवळ-जवळ १७० देशामध्ये आपणास असे आढळून येईल की,तिथे फक्त दोनच जाती आढळून येतील ते म्हणजे स्त्री आणी पुरुष! परंतु तेच भारत देशामध्ये ६६६६ एवढ्या प्रचंड जाती पाहण्यास मिळतील.जाता जात नाही ती जात असते जात ही माणसांच्या सभोवताली चिकटून बसलेली असल्याने जातीयतेचे गुंता आजवर सोडविणे कठीण झाले आहे आणी ते शक्यही नाही.**

आम्ही जातीयतेच्या एवढ्या प्रचंड प्रमाणात आहारी गेलो आहे की,जात सोडल्याशिवाय आम्हाला कुठल्याही स्वरुपाचे कार्य करता येणे शक्य नाही.जणु जन्म घेताच त्या जातीचे जाळे आमच्या शरीराभोवती संरक्षण म्हणुन विणल्या जाते.जाती-जातीचे जाळे खूप दूरवर विस्तारलेले असताना त्यातून मार्ग काढावा यासाठी अनेक संत-महात्म्यांनी समतेचा,समानतेचा अंजेडा रोवला.त्यासाठी झटले,झगडले,स्वता:च्या प्राणांची आहुती दिली. अशा या समाजसुधारकांना आम्ही जातीयतेच्या रेषेमध्येच पुन्हा ओढलो,त्यामुळे मन सुन्न-सुन्न होत जाते.या संत-महात्म्यांच्या क्रांतीकारक महापुरुषांच्या कार्यामुळे भारतभुमी पवित्र झाली आहे. अशा अनेक संतांनी वेगवेगळ्या मार्गांनी विचार पेरण्याचे कार्ये केले; परंतु प्रत्येकाची ज्योत ही एकच असल्याचे दिसून येते.अशातीलच समाजाला कलाटणी देणारे नवप्रेरणा निर्माण करणारे संत म्हणजेच रविदास.मनुष्य रुपात अवतारित परमात्म्यांच्या या रुपाला संत किंवा संतगुरु नाव दिले जाते,असेच एक संत गुरु रविदास हे पण दैवी परंपरेचे एक अंग होते आणी मनुष्य जीवांच्या उद्धाराकरिता कल्याणकारी कार्य करण्याकरिता या मनुष्य संसारात आले होते.

गुरु रविदासांचा जन्म विक्रम सवंत १४३३ इ.स.(१३७६) मध्ये माघ पौर्णिमेस चंद्रवंशीय चर्मकार कुटूंबात झाला.संत रविदासांना रै दास,रेयीदास,रविदास,रोहितदास,रोहिदास अशा विविध स्वरुपी नावाने ओळखले जाऊ लागले.गुरु रविदास १४ व्या शतकातील त्या संत कवीच्या पंगतीतील एक अग्रक्रमांचे नाव आहे,ज्यांनी आपल्या सहज,सोप्या भाषेत भक्तीरसाची पावन गंगा वाहिली.ते बुध्द व कबीर यांच्या परंपरेतील महान व्यक्तीमत्व होते.मानवजीवासाठी समानतेचा संदेश त्यांनी दिला.गुरु रविदास हे जन्मजात संत होते. त्यांनी भक्ती आंदोलनात एक नवीन दिशा देऊन मानवकल्याण आणी समाजसुधारणेस असे स्वरुप दिले की,ज्यामुळे सामाजिक एकतेला वेगळी अशी प्रेरणाशक्ती मिळाली.ज्यामुळे केवळ जुन्या संस्कृतीचेच रक्षण झाले नाही तर मानवतेचे रक्षण करणे देखिल सोपे झाले.शेवटी मानव मानव सर्व समान च्या भावनेने एक वेगळे कल्याणकारी क्रांतीचे रुप धारण केले.तो काळ हिंदू धर्मातील ब्राह्मणी व्यवस्थेच्या छळांनी व्यापलेला होता.शुद्रावर अन्याय,अत्याचार होत असत.जातीयवाद,उच्चवर्णीयता,रुढीवाद,वर्णभेद,जीवघेणी गुलामगिरी यामुळे सामान्यांचे जीवन जगणारी माणसं या त्रासाने व्यथीत होऊन मुत्यु स्वीकारत होती.अशा छळाच्या पंरपरेत संत रविदासांनी वाचा फोडण्यास सुरुवात केली.सर्व छळांनी व्यापलेला बहुजन समाज संत रविदासांकडे आशेच्या किरणाने पाहत होता.

चर्मकार समाजामध्ये जन्म झालेला असल्याने उदरनिर्वाहासाठी त्यांनी वडिलोपार्जीत धंद्यात लक्ष दिले.तेथुनच त्यांनी ब्राह्मणी नीतितत्त्वाचा अभ्यास केला.लोकांना उपदेश करणे, जातीयतेची हीनता लक्षात आणून देणे,स्व-कामापेक्षा लोकहितामध्ये जास्त वेळ घालवणे,अशाप्रकारे लोकांच्या कल्याणासाठीच चळवळ सुरु केली,त्यावर त्यांच्या वडिलांना ब्राह्मणांनी जबरीची ताकीद दिली. तेव्हा रोहिदास म्हणतात,हितोपदेश सांगणे काय ब्राह्मणाचेच काम आहे ? एखादा अस्पृश्य सांगु शकत नाही काय ? त्यावर रविदासाचे वडील म्हणाले,आपण ब्राह्मणांपेक्षा खालच्या वर्गातील,तो आपला अधिकारी नाही हे त्यांच्या मनास खटकले,त्यामुळे त्यांनी कशाचीही पर्वा न करता जातीयतेचे, अस्पृश्यतेचे बंधन तोडून लोकजागृती घडवून आणण्यास प्रवचणे देण्यास सुरवात केली.

संत रोहिदास महाराज खऱ्या अर्थी धर्मनिरपेक्षवादी होते.हिंदू-मुस्लीम कुठल्याही समाजास सारखेच समजत असत.ते पुरोग्रामित्व विचारसरणीचे संत होते. त्यांना मंदिरांशी प्रेम नव्हते,ना मशिदीशी लगाव.त्यांना घृणा नव्हती ते फक्त आपल्या कार्यात ईश्वर शोधत होते.जातीयतेची गुलामगिरी नष्ट करण्यास संत रोहिदास महाराजांनी आयुष्यभर संघर्ष केला.माणसाला माणूस म्हणुन जगविणारी जातीयता रोहिदासांना नकोशी होती.उच्च-निचता, स्पृश्य-अस्पृश्य मानणारेच खरे ढोंगी,लबाड असतात जो माणूस जाती-जातीमध्ये गुतंलेला आहे,तो माणुस रोहिदासासोबत कधीच जोडल्या जाऊ शकत नाही.माणसाची माणुसकी कशाप्रकारे असायला हवी,यासाठी त्यांना जीवनभर आलेले अनुभव त्यांनी समाजप्रबोधनासाठी उपयोगात आणण्याचा प्रयत्न केला.अस्पृश्य समाजात जन्म घेतल्याने ब्राह्मण पंडीतांनी त्यांना गंगेचे स्नान करु दिले नाही तसा प्रयत्न केला तरी जीव गमवावा लागेल,अशी धमकी त्यांच्या काळजात खोलवर रुतून बसली.जातीयता संपल्याशिवाय समाजाचा विकास साधता येणार नाही कारण जात ही ऐखाद्या महाभंयकर रोगासारखी आहे.जातकुजात जन्म,जात,वंश यालाच काही महत्त्व नसून आम्ही सगे सोयरे आहोत. जात-परजातीचा माणूस इथे कोणीच नाही.आपल्या कार्यामुळेच आपण लहान मोठे होत असतो.सगळेच जीव एका चामड्यापासून बनले आहे. प्रत्येक जीवात हाळ, मास आहे,सर्व समसमान असतांनाही जातीयतेची दरी कशासाठी ? का म्हणून आम्ही जातीची बंधने लादून घ्यायची असे ते नेहमी सांगत असत.संत रोहिदासांनी ब्राह्मण पंडीतांसोबत सतत वैचारिक संघर्ष केला आणी मानव धर्माचा प्रचार प्रसार केला.ब्राह्मण,मौलवी,शेख सगळी मानवजात समान असल्याने ते समतेचे पुरस्कर्ते ठरतात.समता स्वातंत्र्य व बंधुभावाची स्थापना करणारा तत्त्ववेत्ता म्हणजेच संत रोहिदास महाराज होय. त्यांच्या १८१ वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांनी ४१ साखीया,११७ पदे आणी २०० हून अधिक ओव्या अशाप्रकारे साहित्य निर्मिती केली तरी समाज त्यांच्या पासुन वंचित राहिला आज संत कबीर,गौतम बुध्द यांच्या विचारांबरोबर रोहिदासाच्या विचारांची समाजाला गरज आहे. ते समाजाला जास्त प्रेरणादायी ठरु शकतात.कारण ते सर्वांचे मार्गदर्शक मोठ्या बंधुसारखे संत होते.अशा या महान दिव्यात्म्यास कोटी कोटी शतश: प्रणाम

■ **निलेश र.जामठे**
**जिल्हाध्यक्ष :**
**राष्ट्रिय चर्मकार महासंघ, अमरावती**
**मो.नं.९०११३१६७९४**

**आर पार** ■ पान २ वरुन...

शकत नाही. राष्ट्रीय चर्मकार महासंघ ही एकमात्र अशी संघटना आहे त्याचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे जाळे संपूर्ण देशभरात, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचले आहेत. पन्नास छोट्या मोठ्या संघटना मिळून जरी एखादा मेळावा घ्यायचे ठरवले तरीही फक्त एकट्या राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे फक्त पदाधिकारीच त्या संख्येपेक्षा अधिक दहापाटीने जमण्याची क्षमता ठेवून आहे. आणि हे बुलढाण्याच्या आंदोलनात सर्वांनी अनुभवले आहे. मग समाजबांधवांनी इकडे तिकडे भरकटण्यापेक्षा राष्ट्रीय चर्मकार महासंघात सामील होऊन समाजाची सेवा केली तर चुकले कुठे?

तेव्हा माझी समस्त चर्मकार बांधवांना नम्र विनंती आहे की, आपापल्या संघटनेच्या माध्यमातून निश्चितच समाजाची सेवा करा, मात्र ऐक्य परिषदेचे राजकारण स्वतःच्या हितासाठी / स्वार्थासाठी करू नका. अन्यथा समाज तुम्हाला कधीच माफ करणार नाही.

जय रविदास ! जय भीम !!

■ **डॉ. शांताराम कारंडे**
मोबाईल नं. ९८२०१ ५८८८५
dr.shantaramkarande@gmail.com



गाळण बु ग्रामपंचायत च्या सरपंच पदी श्री राजेंद्र सावंत यांची निवड गेल्या ४० वर्षानंतर चर्मकार समाजास न्याय मिळाला असे मत चर्मकार समाजाचे पाचोरा तालुक्यातील युवा नेतृत्व श्री अनिलभाऊ सावंत सर यांनी व्यक्त केले चर्मकार समाजाचे तसेच दलित व गावांचा विकास हेच माझे ध्येय राहणार असे मत नवनिर्वाचित सरपंच श्री राजेंद्र सावंत यांनी व्यक्त केले

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या प्रयत्नातुन स्टॉल वाटप

माजलगाव । वार्ताहार

येथील चर्मकार बांधवाना आपला व्यवसाय सुरू करण्या साठी ३०/१/२०२१रोजी उनवने साहेब समाज कल्याण बीड यांच्या सहकार्याने माजलगाव येथे शिल्लक असलेले स्टॉल राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या पाठ पुराव्या मुळे सर्व स्टॉल गटई कामगारास वस्तीग्रह अध्यक्षक राऊत मॅडम व जिल्हा अध्यक्ष नानासाहेब घोडके, युवा जिल्हा अध्यक्ष राजेश जाधव, तालुका अध्यक्ष सुभाष कांबळे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले




त्यावेळेस वस्तीग्रहातील कर्मचारी आणि सीताराम सोनवने,भीमराव गायकवाड, प्रकाश वाघमोडे उपस्तीत होते त्यामुळे गटई कामगार बांधात समाधान व्यक्त होत आहे नानासाहेब बोडके समाजासाठी काम करीत असल्यामुळे समाज बांधव यांचे आभार मानत आहे

## महासंघाचे महासचिव उमाकांत डोईफोडे यांची देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार मागासवर्गीय सूतगिरणीला सदिच्छा भेट




राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे महासचिव उमाकांत डोईफोडे यांनी अशोकराव माने यांच्या देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार मागासवर्गीय सूतगिरणीला सदिच्छा भेट दिली त्याप्रसंगीचे छायाचित्र.

**अधिकृत RCM** *ईमासिकाचे वार्षिक सभासद व्हायचंय?*
**मग वाट कसली बघतायं? लगेच संपर्क साधा :**
**आर.सी.एम. प्रचार आणि प्रसार विभाग :**
**९८२०१५८८८५ / ७७२२०७९१२५**